# कफ परेड ते सीएसएमटीपर्यंत डाऊनलाईनचे काम पूर्ण

## भुयारीकरणाचा ३७ वा टप्पा पूर्ण

**पॅकेज-१ च्या भुयारीकरणाचा तपशील**

- कफ परेड ते विधान भवन (अप लाईन १२२८ मीटर, डाऊन लाईन १२५४ मीटर)
- विधान भवन ते चर्चगेट (अप लाईन ४१८ मी, डाऊन लाईन ४८१ मी)
- चर्चगेट ते हुतात्मा चौक (अप लाईन ६५४ मी)
- हुतात्मा चौक ते सीएसएमटीअप लाईन (डाऊन लाईन ५६९ मी)

**प्रतिनिधी : मुंबई**

ऐतिहासिक वारसा इमारतीजवळील मेट्रो-३ च्या पॅकेज-१ चे ९६ टक्के भुयारीकरण मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनद्वारे पूर्ण करण्यात आले. या पॅकेज अंतर्गत गुरुवारी भुयारीकरणाचा ३७ वा टप्पा यशस्वीरीत्या पार पडला. हुतात्मा चौक ते सीएसएमटी हा डाऊनलाईन मार्गाचा ५६९ मीटर भुयारीकरणाचा टप्पा ४१८ रिंग्जच्या सहाय्याने १०६ दिवसात पूर्ण झाला. भुयारीकरणासह पॅकेज-१ मधील कफ परेड ते सीएसएमटी दरम्यान २.९ किमी लांबीचे डाऊनलाईनचे भुयारीकरण पूर्ण झाले आहे. सूर्या-२ या रॉबिन्स बनावटीच्या ड्युएल-मोड हार्ड-रोक टनेल बोअरिंग मशीनद्वारे हे भुयारीकरण पूर्ण करण्यात आले आहे.

ऐतिहासिक वारसा इमारती व समुद्रानजीक भुयारीकरण करणे जिकिरीचे आहे. मात्र आमच्या अभियंत्यांच्या व कामगारांची उत्कृष्ट टीम हे शिवधनुष्य लीलया पेलत आहे. मला आनंद वाटतो की ऐतिहासिक वारसा इमारतीजवळून भुयारीकरण करताना सर्व सुरक्षेविषयी दक्षता घेत पॅकेज -१ चे आतापर्यंत ९६ टक्के भुयारीकरण पूर्ण झाले, असे मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनचे व्यवस्थापकीय संचालक रणजित सिंह देओल यांनी सांगितले. मेट्रो-३ प्रकल्पासाठी आतापर्यंत ९५ टक्के भुयारीकरण पूर्ण झाले आहे. पॅकेज-१ अंतर्गत कफ परेड, विधान भवन, चर्च गेट आणि हुतात्मा चौक या मेट्रो स्थानकांचा समावेश असून आतापर्यंत या पॅकेज अंतर्गत सहा भुयारीकरणाचे टप्पे पूर्ण झाले.